# राशिभविष्य - फ़ेब्रुवारी, २०११.

**दादा दामले (**dadadamle@hotmail.com**)**

**(१) मेष-**या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत केतु असून षष्ठ स्थानी कन्या राशीत शनि आहे. या राशीच्या नवम (भाग्य) स्थानी धनु राशीत राहू, प्लुटो व शुक्र असे तीन ग्रह असून येथील शुक्र दिनांक २४ पासून या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत जात आहे. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत रवि, मंगळ, बुध हे तीन ग्रह आहेतच. या राशीच्या दशम स्थानी असलेले रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह अनुक्रमे दिनांक १३, १५ व १८ रोजी.या राशीच्या एकादश (लाभ) स्थानी कुंभ राशीत जात आहेत. शिवाय या राशीच्या एकादश (लाभ) स्थानी कुंभ राशीत नेपच्यून आहेच. या राशीच्या द्वादश (व्यय) स्थानी मीन राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह आहेत. अशी या महिन्यात या राशीची एकूण ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात व सामाजिक कार्यात रस असेल त्यांचा त्यांच्या कार्यामुळे समाजात मान वाढेल. तसेच आध्यात्मिक प्रगतीही होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. पण कामाचा असह्य ताण सहन करावा लागण्याची शक्यता आहे. तसेच वरिष्ठांशी मतभेद संभवतात. या राशीच्या व्यावसायिकांना खळबळजनक घटनांना तोंड द्यावे लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात सर्व काही अनुकुल घडत जाईल व त्यामुळे सर्व प्रकारचे आरोग्य सुधारेल. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना दूरच्या प्रवासाचे वा परदेशगमनाचे योग संभवतात. या राशीच्या युवकांना उत्तम व अपेक्षित अशी नोकरी लाभण्याची शक्यता आहे. भाग्यस्थानातील राहूमुळे कौटुंबिक जीवनात अडचणी, त्रास, दु:ख निर्माण होणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना अनारोग्य व अन्य अडथळ्यांमुळे अभ्यासातील प्रगतीत बाधा येणे संभवते.

**(२) वृषभ -** या राशीच्या द्वितीय (धन) स्थानी मिथुन राशीत केतु असून पंचम स्थानी कन्या राशीत शनि आहे. या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत राहू, प्लुटो व शुक्र असे तीन ग्रह असून येथील शुक्र दिनांक २४ पासून या राशीच्या नवम (भाग्य) स्थानी मकर राशीत जात आहे. या राशीच्या नवम (भाग्य) स्थानी मकर राशीत रवि, मंगळ व बुध असे तीन ग्रह आहेतच. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून या राशीच्या नवम (भाग्य) स्थानी असलेले रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह अनुक्रमे दिनांक १३, १५ व १८ रोजी या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत जात आहेत. या राशीच्या एकादश (लाभ) स्थानी मीन राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह आहेत. अशी या महिन्यात या राशीची एकूण ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध बराच प्रतिकुल असणार आहे. पण महिन्याचा उत्तरार्ध मात्र त्या मानाने खूपच अनुकुल असेल. अनपेक्षित खर्च होणार असल्याने

आर्थिक चिंता निर्माण होईल. जपा. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. पण महिन्याच्या उत्तरार्धात विविध मार्गांनी अर्थलाभ होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात शक्यतो प्रवास टाळा. मनस्ताप, दगदग, मानहानी होण्याची शक्यता आहे. नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांशी मतभेद होएण्याची शक्यता आहे. व्यापार-व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. जपा. महिन्याचा उतरार्ध मात्र खूपच सुखदायक असेल. कारण  गुरु-शुक्र हे दोन्ही शुभ ग्रह अनुकुल असल्यामुळे काहींना भूमिलाभ, काहींना धनलाभ तर या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोगही संभवतो. या राशीच्या विद्यार्थ्यांना जडत्व येऊन काही करू नयेसे वाटेल. पण या महिन्यात आळस झटकून मनापासून अध्ययन करणे शक्य होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतु असून चतुर्थ स्थानी कन्या राशीत शनि आहे. या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत राहू, प्लुटो व शुक्र असे तीन ग्रह असून अष्टम स्थानी मकर राशीत रवि, मंगळ व बुध असे तीन ग्रह आहेत. शिवाय या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत असलेला शुक्र दिनांक २४ पासून या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत जात आहे. या राशीच्या नवम (भाग्य) स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून अनुक्रमे दिनांक १३, १५ व १८ रोजी या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत असलेले रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह या राशीच्या नवम (भाग्य) स्थानी कुंभ राशीत जात आहेत. या राशीच्या दशम स्थानी  मीन राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह आहेत. अशी या महिन्यात या राशीची एकूण ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या मंडळींना विशेष करून या महिन्याचा पूर्वार्ध सर्व प्रकारचे आरोग्य व कौटुंबिक सुखसमाधानाचे दृष्टीने अतिशय प्रतिकुल आहे. उष्णताविकार, रक्तविकार, पोटाचे विकार अशापैकी आजार, शारीरिक-मानसिक कष्ट यामुळे असह्य मनस्ताप होईल. नोकरी-व्यवसायातही विविध कारणांनी मनस्ताप सहन करावा लागेल. पण केवळ शैक्षणिक, बौद्धिक चिकित्सा व्यवसाय, संशोधन क्षेत्र असणारांनाच महिन्याचा बहुतांश काळ अनुकुल होईल. काहींना बढती, तर काहींना नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल.  शक्यतो प्रवास टाळा. त्रास व मनस्ताप होणे शक्य आहे. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या काही मंडळींची बुद्धी विकृत होऊन कुसंगतीशी संग होणे नाकारता येत नाही. जपा. कौटुंबिक आजारपणे व वाद, भांडणे यांमुळे गहरे नैराश्य येणेही शक्य आहे. मनावर संयम ठेवून व तोंडाला कुलुप लावून आचरण झाल्यास होणारा बराचसा त्रास आपोआप विरून जाईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत शनि असून षष्ठ स्थानी धनु राशीत शुक्र, राहू व प्लुटो असे तीन ग्रह आहेत. येथील शुक्र दिनांक २४ पासून या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत जात आहे. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत रवि, मंगळ व बुध असे तीन ग्रह आहेतच. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून अनुक्रमे दिनांक १३, १५ व १८ या दिवशी रवि, मंगळ व बुध हे तिन्ही ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत जात

आहेत. या राशीच्या नवम (भाग्य) स्थानी मीन राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून द्वादश (व्यय) स्थानी मिथुन राशीत केतु आहे. अशी या महिन्यात या राशीची एकूण ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा बराचसा काळ सर्व प्रकारे प्रतिकुल असाच असणार आहे. केवळ भाग्यस्थानी असलेल्या स्वराशीच्या गुरुमुळे प्रतिकुल काळाशी मुकाबला करणे शक्य होईल. म्हणून स्वत:वर ताबा ठेवून मनावर संयम ठेवून व अविचाराच्या ऊर्मीला ताब्यात ठेवून नम्रतेचे आचरण केलेत तर गुरुकृपेने सर्व सुखाचे होईल. विशेष करून दिनांक २१ ते २४ हे चार दिवस असह्य मनस्ताप देणारे असण्याची दाट शक्यता आहे. कोर्टप्रकरणे असतील तर ती लांबवण्याचा प्रयत्न करा. भागीदारी व्यवसाय असणारांनी भागीदारीत मतभेद होणार नाहीत याची काळजी घ्या. वैवाहिक व कौटुंबिक जीवनात कटकटी व मनस्ताप होणे शक्य आहे. तसेच कौटुंबिक आजार, स्वत:चे अनारोग्य यामुळे खर्चात वाढ होणे संभवते. काही जणांना कमरदुखीचा असह्य त्रास होण्याची शक्यता आहे. शनिमुळे भावंडविषयक समस्येला तोंड द्यावे लागेल. नेपच्यूनमुळे जलभय, विषभय असून सूचक स्वप्ने पडतील. उच्च शास्त्रीय सशोधन करत असणारांना अपेक्षित यश मिळू शकेल. स्वत:चे सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखून जबाबदारी पार पाडा.

**(५) सिंह -** या राशीच्या द्वितीय (धन) स्थानी कन्या राशीत शनि असून पंचम स्थानी धनु राशीत राहू, प्लुटो व शुक्र असे तीन ग्रह आहेत. येथील शुक्र दिनांक २४ पासून या राशीच्या षष्ट स्थानी मकर राशीत जात आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत रवि, मंगळ आणि बुध हे तीन ग्रह आहेतच. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून अनुक्रमे दिनांक १३, १५ व १८ रोजी या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत असलेले रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत जात आहेत. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून एकादश (लाभ) स्थानी मिथुन राशीत केतु आहे. अशी या महिन्यात या राशीची एकूण ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात अत्यंत सावधानतेने, मन व बुद्धीवर ताबा ठेवून अत्यंत सहनशीलतेने आचरण केले तरच अनारोग्याचा फ़ारसा त्रास होणार नाही. तसेच मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांचा असह्य त्रास सहन करणे शक्य होईल. विशेष करून महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल ग्रहस्थितीमुळे जीवनाच्या सर्वच आघाड्यांवर धैर्याने लढावे लागणार आहे. साडेसातीचा अखेरचा टप्पा आहे. जपा. अपप्रचार, गैरसमज यांकडे दुर्लक्ष करा. वाहने सावधानतेने चालवा. भांडणाचे प्रसंग आले तर गप्प बसा. दुर्लक्ष करा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपले पाहिजे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग, मनस्ताप करून घेऊ नये. नोकरी-व्यवसायात आहे ती स्थिती व्यवस्थित राहील इकडे लक्ष द्यावे. कोर्टप्रकरणे पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. भागीदारी व्यवसाय असणारांनी गैरसमज होणार नाहीत याची काळजी

घ्यावी. मन संयमित व शांत ठेवा व अति विचार करू नका. आर्थिक फ़सवणूक होणार नाही याची काळजी घ्या. या राशीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणात अडथळे येणार नाहीत इकडे जरूर लक्ष द्यावे.

**(६) कन्या -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शनि असून चतुर्थ स्थानी धनु राशीत राहू, शुक्र व प्लुटो असे तीन ग्रह आहेत. येथील शुक्र दिनांक २४ पासून या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत जात आहे. या पंचम स्थानी मकर राशीत रवि, मंगळ व बुध असे तीन ग्रह आहेतच. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून अनुक्रमे दिनांक १३, १५ व १८ रोजी या राशीच्या  पंचम स्थानी मकर राशीत असलेले रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत जात आहेत. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत गुरु व हर्षल हे दोन ग्रह असून दशम स्थानी मिथुन राशीत केतु आहे. अशी या महिन्यात या राशीची एकूण   ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या मंडळींना कौटुंबिक व वैवाहिक जीवनात असमाधानकारक घटना घडत असल्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने थोडा आधार मिळेल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. विशेष करून शेती व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. या राशीच्या नोकरी करत असणारांनी सरळ मार्गानेच आपले कर्तव्य पार पाडावे. नपेक्षा विपरीत तेच घडेल. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात संततीचे आजारपण, मनाविरुद्ध आचरण यांमुळे त्रस्त व्हाल. दांपत्यजीवनात मतभेद, भांडणे होणार नाहीत याची काळजी घ्या. या राशीच्या काही मंडळींना अकारण स्वत:स कसला तरी आजार झाला असल्याची भावना होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. चोरी, फ़सवणूक, विश्वासघात अशापैकी काही तरी घडून मनस्ताप सहन करावा लगण्याची शक्यता दिसते. महिन्याचा उत्तरार्ध अधिक अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर मन:शांतीसाठी गुरुचरित्राचे पारायण करावे.

**(७) तुळा -** या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत राहू, प्लुटो व शुक्र असे तीन ग्रह असून येथील शुक्र दिनांक २४ पासून या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत जात आहे. या चतुर्थ स्थानी मकर राशीत रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह आहेतच. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून अनुक्रमे दिनांक १३, १५ व १८ रोजी या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत असलेले रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत जात आहेत. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून नवम (भाग्य) स्थानी मिथुन राशीत केतु व द्वादश (व्यय) स्थानी कन्या राशीत शनि आहे. अशी या महिन्यात या राशीची एकूण ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात शुभ ग्रह गुरु-शुक्र व काही प्रमाणात

बुध अशा तीन ग्रहांच्या अनुकुलतेमुळे थोडा दिलासा मिळून जीवन सुसह्य होईल. शेती, फ़ोटोग्राफ़ी, शिक्षणक्षेत्र, उच्च बौद्धिक क्षेत्र, अध्यात्म अशा कार्यक्षेत्रांत कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. तरीही काही नोकरदार मंडळींना वरिष्ठांच्या नाराजीला तोंड द्यावे लागेल. पण शनि, मंगळ, रवि हे तीन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे स्वत:चे व कुटुंबियांचे आजारपण, विचित्र विरोधी घडणाऱ्या घटनांमुळे होणारा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. सावधानतेने आचरण करा.अपघात भय आहे, जपा.सुदैवाने आर्थिक चिंता करावी लागणार नाही

कौटुंबिक सुख व संततिसुखाच्या दृष्टीने मात्र काळ असह्य मनस्ताप देणारा असाच असण्याची दाट शक्यता आहे. प्रिय जनांपैकी कोणाची बदली झाल्यामुळे त्यांचा दुरावा सहन करावा लागेल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण मनस्ताप व दगदग करून घेऊ नये. अकारण अति विचारामुळे काहींच्या मेंदूवर ताण पडण्याची शक्यता दिसते. काहींना असह्य डोकेदुखीचा त्रास होणे संभवते.

**(८) वृश्चिक -**या राशीच्या द्वितीय (धन) स्थानी धनु राशीत राहू, प्लुटो व शुक्र असे तीन ग्रह असून येथील शुक्र दिनांक २४ पासून या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत जात आहे. या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह आहेतच. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून अनुक्रमे दिनांक १३, १५ व १८ रोजी या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत असलेले रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत जात आहेत. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून अष्टम स्थानी मिथुन राशीत केतु आणि एकादश (लाभ) स्थानी कन्या राशीत शनि आहे. अशी या महिन्यात या राशीची एकूण ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात गुरु-शुक्र-शनि व हर्षल हे चार ग्रह पूर्णपणे अनुकुल होणार असून रवि-मंगळ केवळ महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल होतील. उत्तरार्धात ते पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. तसेच राहू-केतु व नेपच्यून पूर्णपणे प्रतिकुल असतील; तर बुध केवळ उत्तरार्धातच अनुकुल होईल. शुभ ग्रहांमुळे धनलाभ, अर्थलाभ होतीलच; पण त्याचबरोबर खर्च वाढ, अनपेक्षित खर्च हॊण्याचीही शक्यता दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी-व्यवसायात प्रगतिकारक अनुकुल घटना घडतील, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण उत्तरार्धात अनेक कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे संभवते. गैरसमज, भांडणे, मनाविरुद्ध घडणारी घटना अशापैकी विविध कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. चिकित्सक व संशोधनात्मक शैक्षणिक क्षेत्र वा व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. अपघातभय आहे. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू, प्लुटो व शुक्र असे तीन ग्रह असून

येथील शुक्र दिनांक २४ पासून या राशीच्या द्वितीय (धन) स्थानी मकर राशीत जात आहे. या राशीच्या द्वितीय (धन) स्थानी मकर राशीत रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह आहेतच. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून अनुक्रमे दिनांक १३, १५ व १८ रोजी या राशीच्या द्वितीय (धन)स्थानी असलेले रवि, मंगळ व बुध हे तिन्ही ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत जात आहेत. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून सप्तम स्थानी मिथुन राशीत केतु व दशम स्थानी कन्या राशीत शनि आहे. अशी या महिन्यात या राशीची एकूण ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात राहू-केतु घरीदारी मनस्तापदायकच असणार आहेत. गुरु ग्रह गहसौख्य देऊ शकणार असला तरी नातेवाईकांशी भांडणे व सतत तक्रारी करण्याचा या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव यांमुळे कौटुंबिक सुखात बाधा येऊ शकेल. कोणाशीही पटणार नाही. पण कुटुंबात स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात स्वत:चे अनारोग्य, डोळ्याची दुखणी, उष्णताविकार -- घसा, मान दुखणे -- खर्च वाढ, फ़सवणूक, द्यावयाचे देणे द्याल; पण येणे वसूल होणार नाही. त्यामुळे अर्थचिंता संभवते. उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. काहींना परदेशगमनाचे तर काहींना जलप्रवासाचे योग येतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात थोडे वैवाहिक व कौटुंबिक सुखसमाधान मिळण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील; पण पूर्वार्धात मात्र सावधानतेने आचरण होणे आवश्यक आहे. विरोधकांचा त्रास होईल. जपा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि, मंगळ व बुध असे तीन ग्रह असून द्वितीय (धन) स्थानी कुंभ राशीत नेपच्यून आहे. अनुक्रमे दिनांक १३, १५ व १८ रोजी या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी असलेले रवि, मंगळ व बुध हे तिन्ही ग्रह या राशीच्या द्वितीय (धन) स्थानी कुंभ राशीत जात आहेत. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह असून षष्ठ स्थानी मिथुन राशीत केतु व नवम (भाग्य) स्थानी कन्या राशीत शनि आहे. या राशीच्या द्वादश (व्यय) स्थानी धनु राशीत राहू, प्लुटो व शुक्र असे तीन ग्रह असून येथील शुक्र दिनांक २४ पासून या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. अशी या महिन्यात या राशीची एकूण ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि, मंगळ, बुध व नेपच्यून हे चार ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून सतत अर्थचिंता, आर्थिक नुकसान, घोटाळे, फ़सवणूक, आर्थिक जबाबदाऱ्यांचे ओझे देणारा, श्रम, दगदग सहन करावयास लावणारा व त्यामुळे अनारोग्यकारक असा या महिन्याचा काळ असणार आहे. राहू-केतु काही प्रमाणात अनुकुल होणार असले तरी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे शक्य आहे. गुरु-हर्षल उच्च बौद्धिक कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल होतील. या राशीची जी मंडळी  ग्रंथलेखनकार्यात मग्न असतील

त्यांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. काहींना परदेशगमनाचे वा दूरच्या प्रवासाचे योग संभवतात. या राशीच्या मंडळींना भावंडांपासून त्रास होण्याची शक्यता आहे. भाग्यस्थानी असलेला शनि अशुभकारक नसला तरी फ़ारसे सुखसमाधान देणाराही असणार नाही. नोकरी-व्यवसायात सहनशील बनून नम्रतेचे आचरण कराल तर होणारा मनस्ताप खूपच टळेल.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत नेपच्यून असून द्वितीय (धन) स्थानी मीन राशीत गुरु व हर्षल असे दोन ग्रह आहेत. या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत केतु असून अष्टम स्थानी कन्या राशीत शनि आहे. या राशीच्या एकादश (लाभ) स्थानी धनु राशीत राहू, प्लुटो व शुक्र असे तीन ग्रह असून येथील शुक्र दिनांक २४ रोजी या राशीच्या द्वादश (व्यय) स्थानी मकर राशीत जात आहे. या राशीच्या द्वादश (व्यय) स्थानी मकर राशीत रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह अनुक्रमे दिनांक १३, १५ व १८ रोजी या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहेत. अशी या महिन्यात या राशीची एकूण ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचे एकूण सर्वच ग्रहमान प्रतिकुल असेच असणार आहे. बुद्धी व मन शांत व संयमित राखून सहनशीलतेचे आचरण झाल्यासच गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून सुखानंदसंतोषाचा थंडावा अनुभवता येईल. या काळात या राशीच्या मंडळींचे मन अतिशय हळवे, कोमल असे बनणार आहे. त्यामुळे थोडेही मनाविरुद्ध घडले तरी गहरे नैराश्य येणे संभवते. जिभेला लगाम घालून विचारपूर्वक आचरण झाले, तर गुरुकृपेने व शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या मंडळींना घडून येणाऱ्या लाभदायक घटनांचा आनंद लुटता येईल. कुटुंबात शुभ घटना घडतील. व्यवसायात प्रगती होईल. क्षणिक सुखसमाधान लाभेल. रवि, मंगळ, बुध व शनि हे चारही महत्त्वाचे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल व आरोग्यविघातक असल्याचाच अनुभव येईल. राहू-केतुमुळे संततिसमस्या निर्माण होऊन संततिसुखात बाधा येणे संभवते. काही जुनी दबलेली मनस्तापदायक प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. मनस्ताप, श्रम व दगदग होऊन शारीरिक मानसिक आरोग्यावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता आहे. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु व हर्षल असून चतुर्थ स्थानी मिथुन राशीत केतु आहे. या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत शनि असून दशम स्थानी धनु राशीत राहू, प्लुटो व शुक्र असे तीन ग्रह आहेत. येथील शुक्र दिनांक २४ रोजी या राशीच्या एकादश (लाभ) स्थानी मकर राशीत जात आहे. या राशीच्या एकादश (लाभ) स्थानी मकर राशीत रवि, मंगळ व बुध हे तीन ग्रह आहेतच आणि ते तिन्ही ग्रह अनुक्रमे १३, १५ व १८ रोजी या राशीच्या द्वादश (व्यय) स्थानी कुंभ राशीत जात आहेत. या राशीच्या द्वादश (व्यय) स्थानी कुंभ राशीत नेपच्यूनही आहेच. अशी या महिन्यात या राशीची एकूण ग्रहस्थिती आहे.

**अनुमान -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या पूर्वार्धातच बहुतेक सर्व ग्रह अनुकुल असणार आहेत. मन व बुद्धी स्थिर राखून आणि संयमशील आचरण झाल्यास हा महिन्याचा पूर्वार्ध खूपच अनुकुल, प्रगतिकारक व सुखानंदाचा जाईल. महिन्याचा उत्तरार्ध पूर्णपणे प्रतिकुल असणार असून विविध कारणांनी असह्य मनस्ताप होण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन असह्य मनस्ताप देतील. या राशीच्या पुरुषवर्गाला स्त्रीवर्गाकडून त्रास होण्याची शक्यता आहे. जपा. शनिमुळे स्वत:चे व जीवनसाथीचे आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. या राशीच्या युवकयुवतींनी कुसंगतीपासून जपावे. या राशीची लहान मुले अत्यंत हूडपणा व व्रात्यपणा करून मनस्ताप देतील. लक्ष ठेवा. नेपच्यून गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल; पण इतरांना नैराश्यच देईल. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरीत असणाऱ्या काही मंडळींना महिन्याच्या पूर्वार्धातच बढती, पगारवाढ आदि प्राप्त होणे संभवते. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने महिन्याचा अखेरचा सप्ताह सुखसमाधान देणारा असेल.

-----०००००-----